**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 18.11.2025** **वार- मंगळवार**

---

**राज्यपाल देवव्रत**

आपल्या देशात रासायनिक शेतीमुळं मानवी आरोग्यापुढे गंभीर आव्हान उभं राहिलं आहे. या आव्हानाला तोंड देण्यासाठी नैसर्गिक शेती हा प्रभावी पर्याय असून, पुढील पिढ्यांचे आरोग्य जपण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला फॅमिली डॉक्टरपेक्षाही नैसर्गिक शेती करणारा शेतकरी अधिक गरजेचा ठरेल, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं. रासायनिक शेतीची पद्धत न बदलल्यास भविष्यात गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल असंही त्यांनी सांगितलं. शिवाजीनगर इथल्या कृषि महाविद्यालयात आयोजित एक दिवसीय नैसर्गिक शेती परिषदेच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.

यावेळी राज्याचे कृषि आणि पशुसंवर्धन मंत्री दत्तात्रय भरणे आणि कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी उपस्थित होते. रासायनिक खताच्या अधिक वापरामुळं मातीची सुपीकता, पिकाचा स्वाद आणि पोषणमूल्य कमी झालं असून गहू आणि तांदूळातील पोषक घटक 45 टक्क्यांपर्यंत कमी झाले आहेत असं भरणे यांनी यावेळी सांगितलं.

**नैसर्गिक खाद्य महोत्सव**

राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेतर्फे येवलेवाडी इथल्या निसर्गग्राम परिसरात आठव्या निसर्गोपचार दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय नैसर्गिक खाद्य महोत्सवालाही राज्यपालानी हजेरी लावली. निसर्गोपचार ही केवळ उपचारपद्धती नाही, तर निसर्ग आणि माणूस यांच्यात समतोल साधणारी जीवनशैली आहे. निरोगी, आत्मनिर्भर आणि अध्यात्मिक अधिष्ठान असलेला सदृढ समाज घडवण्यासाठी महात्मा गांधी यांनी दिलेला निसर्गोपचाराचा हा वैचारिक वारसा आहे, असं प्रतिपादन राज्यपालांनी केलं.

या कार्यक्रमात केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. निसर्गाशी एकरूप होत संतुलित आहार, योग्य व्यायाम, सकारात्मक चिंतन आणि चांगली जीवनशैली अंगिकारली, तर शरीरातील रोगांना बरे करण्याची ऊर्जा शरीरातच तयार होते असं प्रतिपादन जाधव यांनी केलं.

**उष्ण कटीबंधीय हवामान**

उष्ण कटीबंधीय हवामान शास्त्रावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज पुण्यातल्या पाषाण इथल्या भारतीय उष्ण कटिबंधीय हवामान शास्त्र संस्थेत झालं. “शाश्वत भविष्यासाठी उष्ट कटिबंधीय हवामान, महासागर आणि मॉन्सून हवामान संशोधनातील प्रगती” ही या परिषदेची संकल्पना आहे. पृथ्वी विद्यान मंत्रालयाचे सचिव डॉ एम रविचंद्र यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शेती उद्योग आणि नागरिकांसाठी हवामानाचा अचूक अंदाज महत्वाचा आहे, त्यासाठी हवामान क्षेत्रात नवनवीन संशोधन करून योग्य नियोजन केलं पाहिजे असं रविचंद्र यांनी सांगितलं. उत्कृष्ट कार्य केलेल्या वैज्ञानिकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**परिवहन महामंडळ उभारणार 251 पेट्रोल पंप**

राज्य परिवहन महामंडळानं उत्पन्नाचे नवीन स्त्रोत निर्माण करण्यासाठी राज्यात 251 ठिकाणी सीएनजीसह पेट्रोल, डिझेल आणि इलेक्ट्रीक चार्जिंग सुविधा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळं महामंडळाच्या इंधन केंद्रांवर आता सर्वसामान्य नागरिकांनाही ही सेवा उपलब्ध होणार आहे.

**वाहतूककोंडी**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी खासगी बस आणि आरामगाड्यांना नवीन मार्ग, थांबे, व्यवस्थामध्ये कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी सुरू केली असून, नागरिकांकडून हरकती सूचना मागवून अंतिम आदेश लवकरच जाहीर केला जाणार आहे.

**वाहतूककोंडी**

सायंकाळी 6 ते रात्री 10 या वेळेत ठराविक मार्गावरच खासगी बसेसना प्रवेश मिळणार आहे आणि शहरातील कोणत्याही बस थांब्यावर 3 मिनिटांपेक्षा जास्त वेळ बस थांबण्यास सक्त मनाई आहे.

**क्रीडा**

महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात मानाची समजली जाणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा येत्या 7 डिसेंबर रोजी होणार आहे अशी माहिती आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे विश्वस्त अभय छाजेड यांनी आज पुण्यात पत्रकारांना दिली. स्पर्धेची यंदाची संकल्पना “रन फॉर एन्व्हायरमेंटल सस्टेनीबिलिटी” ही असून या स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरणाचा संदेश देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी इथिओपिया, केनिया, टांझानिया, मॉरिशस या देशातील 70 धावपटू सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे करगिल आणि लडाखमधील मॅरेथॉन विजेतेही या स्पर्धेत धावणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना पुणे महापालिकेकडून 30 लाख रुपयांपर्यंतचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

**क्रीडा**

महाराष्ट्र राज्य अथलेटिक्स चॅम्पियनशिप मैदानी स्पर्धा येत्या शनिवार आणि रविवारी मुंबईतील विद्याविहार इथल्या सोमय्या विद्यापीठात होणार असून या स्पर्धेसाठी पुणे जिल्हा मास्टर्स अथलेटिक्स संघटनेच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात किमान तापमानात लक्षणीय घट झाली असून आज किमान तापमान 9 पूर्णांक 4  दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**